भाप्रसे (संवर्ग) नियम, १९५४ मधील ४ (२) मधील परंतुकानुसार Apex Scale [Level 17 in the Pay Matrix] या संवर्गात दोन पदे तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एईओ-१०१८/प्र.क्र.४१० /२०१८/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **३१.०८.२०१९**

वाचा:- सामान्य प्रशासन विभाग समक्रमांकित दि.१५.०१.२०१९.

प्रस्तावना-

कार्मिक, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्ती वेतन मंत्रालय (कार्मिक व प्रशिक्षण विभाग), भारत सरकार यांच्या दिनांक १५.०६.२०१८ च्या अधिसूचने अन्वये, राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील संवर्ग पदांचे सुधारीत संख्याबळ निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार Apex Scale: Level 17 in the Pay Matrix या संवर्गात ८ संवर्ग पदे मंजूर आहेत. तसेच भाप्रसे (वेतन) नियम २०१६ मधील नियम १२ (७) मधील तरतूदीनुसार आणखी ८ संवर्गबाह्य पदे (SDR) भरता येतात. प्रशासकीय निकडीस्तव सदर संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १५.०१.२०१९ च्या शासन निर्णया अन्वये निर्माण करण्यात आलेल्या २ पदांना मुदतवाढ देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम, १९५४ मधील नियम ४(२) च्या दुस-या परंतुका अन्वये Apex Scale: Level 17 in the Pay Matrix या संवर्गात समक्रमांकाच्या दिनांक १५.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेल्या दोन पदांना दिनांक ०१.०९.२०१९ पासून दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११०५४५६९२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sarita Rishi Bandekar Deshmukh

Digitally signed by Sarita Rishi Bandekar Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5140223e17381bc47a67b9fede8dda33c03e3e9ce591f826d8193080c68a08b8, serialNumber=e40a063b6b4e8f59f91f350aa6fec292a55db5bf8829c64d6c44e00a701cdaac, cn=Sarita Rishi Bandekar Deshmukh
Date: 2019.08.31 15:49:30 +05'30'

(स.रि.बांदेकर-देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
८. निवड नस्ती.